## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ ची साक्ष

## निशाणी क्र. १५

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | – | सैय्यद वाजिद अली मसुद अली, |
| वय | – | ५८ वर्षे, |
| व्यवसाय | – | मिर्ची पावडर व्यावसायिक, |
| सध्या नेमणुक | – | भास्कर कॉलनी, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. घटना दि. ०५.०२.२०२० रोजीची आहे. त्यादिवशी बांधलेल्या भिंतीवर मी पाणी मारत होतो. त्यावेळेस नारायण चौधरी यांच्या घराच्या मागच्या दारातुन आवाज आला. मी इकडुन आवाज दिला परंतु तिकडुन काही प्रतिउत्तर आले नाही. म्हणुन मी समोरील बाजुने गेलो. समोरुन गेलो असता त्याठिकाणी नारायण यांच्या आई होत्या व त्या घाबरलेल्या होत्या. त्यामुळे मी पोलीस स्टेशन येथे फोन केला. पोलीसांनी येवुन कुलुप तोडुन त्यांना बाहेर काढले. त्यावेळेस मी नारायण यांची हुडको कॉलनीत राहणारी बहिण यांना फोन करुन बोलाविले. त्या आल्यावर आजींची तब्येत जास्त खराब असल्याने त्यांना कॉटेज हॉस्पिटल येथे घेवुन गेले.

०२. त्यानंतर पोलीसांनी आमच्याकडे विचारपुस केली. हया अगोदर देखील असे घडले होते. पोलीसांनी प्रस्तुत घटनेबाबत माझा जबाब नोंदविला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जे. पी. कुवर यांचे मार्फत.**

०३. मला चौधरी यांच्या बहिणीचे नाव माहित नाही. मला त्यांचा मोबाईल नंबर माहिती नाही. चौधरी यांच्या बहिणीशी माझी ते राहायला आल्यापासुन म्हणजेच साधारण २००० सालानंतरपासुन ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत:हुन चौधरी यांच्या बहिणीशी ओळख करुन घेतली असे झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या बहिणीने

माझ्याशी ओळख करुन घेतली असे देखील झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, चौधरी यांच्या मेव्हण्याने माझ्याशी ओळख करुन घेतली नाही अथवा मी त्यांच्याशी ओळख करुन घेतली नाही असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, चौधरी यांची बहिण व मी असे एकमेकांनी एकमेकांचा मोबाईल नंबर एकमेकाला दिला असे घडले नाही. मी स्वत:हुन सांगतो की, पोलीसांनी नंबर काढुन दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, नारायण चौधरी यांचे मेव्हणे देविदास चौधरी यांचा मोबाईल क्रमांक पोलीसांनी मला दिल्याने मला तो माहित पडला. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी विचारपुस करण्यापुर्वी मला नारायण चौधरी यांच्या बहिणीचा व मेव्हणे देविदास यांचा मोबाईल नंबर माहित नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी विचारपुस करण्यापुर्वी माझे नारायण चौधरी यांची बहिण अथवा त्यांचे मेव्हणे यांच्याशी बोलणे झाले नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, नारायण चौधरी व माझ्या घरामध्ये एक भिंत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर भिंतीवरुन माझे व नारायण चौधरी यांचे पुर्वीपासुन वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, यापुर्वी घरामध्ये आवाज आला व मी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली असे घडले नाही. मी स्वत:हुन सांगतो की, याच्यापुर्वी आम्ही आवाजच ऐकला नाही. पोलीसांनी माझा जबाब ०६ तारखेला घेतला होता. मी ०६ तारखेचा माझा जबाब वाचला होता. मी स्वत:हुन सांगतो की, ०५ तारखेलाच सर्व लिहुन घेतले होते व मी बाहेर असल्याने ०६ तारखेला जावुन त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा जबाब एकदाच नोंदविला होता. मी ०६ तारखेला सही केलेला जबाब हा पोलीसांच्या ताब्यात दिला होता. मला कोणत्या पोलीसाकडे दिला होता त्याचे नाव माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, ०५ तारखेला नोंदविलेला व ०६ तारखेला सही केलेला सदरहु जबाब हा अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, मागील अनेक वर्षांपासुन नारायण चौधरी यांचे माझ्याकडे व माझे त्यांच्याकडे येणे जाणे नाही.

०५. घराचे कुलुप तोडल्याबाबतचा पंचनामा माझ्यासमक्ष झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी बघितले तेव्हा

आजी मोकळया होत्या व बांधलेल्या वगैरे नव्हत्या. मी स्वत:हुन सांगतो की, फक्त कुलुप होते. हे म्हणणे खरे आहे की, नारायण चौधरी यांच्या घराला गॅलरीचा एक लोखंडी दरवाजा व आतील घराचा एक दरवाजा असे दोन दरवाजे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आजी हया घरामध्ये बंदिस्त नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटे कथन करीत आहे. आजींचे क्रियाकर्म हे नारायण चौधरी यांनी केले किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझी पत्नी शेजारी असल्याने आजींना मुलगा व सुन यांच्याविरुध्द भडकवत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी आज रोजी सरतपासादरम्यान केलेली सर्व कथने ही न्यायालयासमोर प्रथमच कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नसतांना मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.12.09 12:54:32 +0530

दिनांक : ०८/१२/२०२५
स्थळ : दोंडाईचा

(आदित्य घ. नाईक)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – जी. एस. अहिरे,

न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा.

पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. – ०९.१२.२०२५.

स्वाक्षरित/–
लघुलेखक (श्रेणी–३)